मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com | पुणे, पिंपरी-चिंचवड | शनिवार, दि. 18 एप्रिल 2026 | पान- 1

# उष्णतेच्या कडाक्यापासून सतर्क राहण्याचे महापालिकेकडून आवाहन

## उष्णतेच्या कडाक्यापासून नागरिकांनी आरोग्याची काळजी घ्यावी, आपत्कालीन परिस्थितीसाठी वैद्यकीय विभागाची यंत्रणा सज्ज

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरात दिवसेंदिवस तापमानात वाढ होत असून, उष्माघाताचा धोका निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वैद्यकीय विभागामार्फत नागरिकांना आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे. उन्हाळ्याच्या दिवसांत योग्य काळजी घेतल्यास उष्माघातासारख्या गंभीर आजारापासून बचाव करता येऊ शकतो

उष्माघात ही एक गंभीर आरोग्य समस्या असून, शरीराचे तापमान अत्यंत वाढल्यास चक्कर येणे, अशक्तपणा, उलट्या, डोकेदुखी, गोंधळ होणे किंवा बेशुद्धावस्था अशी लक्षणे दिसू शकतात. अशा वेळी विलंब न करता त्वरित सावलीत जाऊन प्राथमिक उपचार घ्यावेत व जवळच्या महापालिका रुग्णालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



महापालिकेच्या सर्व रुग्णालयांमध्ये उष्माघाताच्या रुग्णांसाठी आवश्यक वैद्यकीय सुविधा उपलब्ध असून, आपत्कालीन परिस्थितीत त्वरित उपचार मिळण्यासाठी आरोग्य यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली आहे. नागरिकांनी लक्षणांकडे दुर्लक्ष न करता वेळेवर उपचार घेणे अत्यंत आवश्यक आहे.

महापालिका प्रशासनाकडून सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे की, वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर योग्य ती खबरदारी घेऊन उष्माघातापासून स्वतःचे व आपल्या कुटुंबाचे संरक्षण करावे.

> उन्हाळ्यातील वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या आरोग्याच्या संरक्षणाला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले आहे. संभाव्य उष्माघाताच्या घटनांचा विचार करून महापालिकेच्या सर्व रुग्णालयांमध्ये आवश्यक सुविधा आणि वैद्यकीय यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली आहे. नागरिकांनी योग्य ती खबरदारी घ्यावी आणि कोणताही त्रास जाणवल्यास त्वरित महापालिका रुग्णालयात उपचार घ्यावेत.
>
> - डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

> उष्माघात ही टाळता येण्याजोगी पण गंभीर समस्या आहे. विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि बाहेर काम करणाऱ्यांनी अधिक काळजी घेणे आवश्यक आहे. शरीरातील पाण्याची कमतरता आणि अतिउष्णतेमुळे चक्कर येणे, मळमळ, डोकेदुखी, अशक्तपणा अशी लक्षणे दिसू शकतात. अशी लक्षणे जाणवताच विलंब न करता सावलीत विश्रांती घ्यावी आणि त्वरित जवळच्या महापालिका रुग्णालयात उष्माघातावर प्रतिबंधात्मक उपचार घ्यावेत.
>
> - डॉ. लक्ष्मण गोफणे, आरोग्य वैद्यकीय अधिकारी, पिंपरी चिंचवड महापालिक

# बांधकाम पूर्ण झाल्यानंतरची कारवाई सर्वसामान्य नागरिकांवर अन्यायकारक : खासदार श्रीरंग बारणे

## बांधकाम सुरु असतानाच कारवाई करा; नालेसफाई व स्वच्छतेकडेही लक्ष देण्याची मागणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरात अनधिकृत बांधकामे होत असताना प्रशासनाकडून डोळेझाक केली जाते. दोन मजल्यापर्यंत बांधकामे होईपर्यंत त्याकडे कानाडोळा केला जातो. बांधकाम पूर्ण झाल्यानंतर कारवाई केल्याने सर्वसामान्य नागरिकांवर अन्याय होतो. त्यामुळे प्रशासनाने अनधिकृत बांधकाम होऊ नयेत यासाठी प्रयत्न करावेत, अशी सूचना खासदार श्रीरंग बारणे यांनी आयुक्तांना केली. बांधकाम पूर्ण झाल्यानंतर केलेल्या कारवाईमुळे प्रशासनाचे पैसे आणि वेळही वाया जातो याकडेही त्यांनी लक्ष वेधले.

खासदार बारणे म्हणाले, आयुक्तांनी प्रशासनावर नियंत्रण ठेवावे. त्यांच्या तालावर वागू नये, शहराबाबतचे वादग्रस्त विधान आणि बोगस उपसूचनांद्वारे ठेकेदारांना दिलेले ५२ कोटी रुपयांची बिले यावरील नागरिकांचे लक्ष विचलित करण्यासाठी कारवाईची मोहिम हाती घेतल्याचे दिसते. बांधकाम परवानगीसाठी अनेक टेबल वाढवून भ्रष्टाचार मोठ्या प्रमाणावर चालू आहे. एक प्रकारे महापालिकेचे अधिकारी कर्मचारी वसुलीच करत आहेत. 'वन विंडो' परवानगी मिळावी यासाठी आपण प्रयत्न करावेत.



तसेच महापालिकेचे मैला मिश्रित पाणी थेट नदीपात्रात जाते, याबाबत कार्यवाही करावी. महापालिका क्षेत्रातील उद्यानांची झालेली दुरवस्था याबाबत ठोस निर्णय घ्यावा. महापालिकेच्या रस्त्यावरील अतिक्रमण हटवावे आणि बांधकाम सुरू होण्यापूर्वीच त्याची दखल घ्यावी. तसेच महापालिका क्षेत्रातील स्वच्छता व सुरक्षा, सध्या बंद असलेले सीसीटीव्ही कॅमेरे चालू करण्यात लक्ष द्यावे.

स्मार्ट सिटी योजनेत झालेल्या कामाच्या दर्जाबाबत चौकशी करावी आणि सद्यस्थितीत चालू असलेल्या कामाबाबत गांभीर्याने लक्ष घालावे, याबाबत मी सातत्याने प्रशासनाला सूचना दिल्या आहेत. या महत्वाच्या कोणत्याही कामाकडे अधिकाऱ्यांचे लक्ष नाही. आयुक्तांनी अनधिकृत बांधकामे पाडण्याचे आदेश दिलेले आहेत. यामध्ये बांधकाम सुरू होण्यापूर्वीच लक्ष घातले नाही, ही चुकी कोणाची याचाही शोध लावावा. महत्वाच्या प्रश्नांकडील लक्ष हटवण्यासाठी कदाचित अनधिकृत बांधकाम पाडण्याची मोहीम हाती घेतली असेल. हा गरीब नागरिकांवर होत असलेला अन्यायकारक प्रकार आहे.

अतिक्रमण विभागातील संबंधित अधिकाऱ्यांनी याच्यावरती गांभीर्याने लक्ष घातले नाही. त्याचा परिणाम गोरगरीब माणसाला भोगावा लागत आहे. स्वच्छ पाणी तसेच महापालिका क्षेत्रामध्ये प्रचंड होत असलेले प्रदूषण, नदी प्रदूषण व पावसाळ्यापूर्वी नालेसफाई याच्यावरती गांभीर्याने लक्ष घालून ते पूर्ण करण्यात लक्ष केंद्रित करावे. एकाच जागेवर अनेक वर्षांपासून काम करत असलेल्या अधिकाऱ्यांची बदली करावी, अशी सूचना खासदार बारणे यांनी आयुक्तांना केली आहे.


# 'आधुनिक भारताचे शिल्पकार' पुस्तकाचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रकाशन

## आमदार अमित गोरखे लिखित आधुनिक भारताचे शिल्पकार पुस्तकाचे प्रकाशन उत्साहात संपन्न

**पिंपरी | प्रतिनिधी**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे समता, स्वातंत्र्य आणि बंधुतेचे विचार नव्या पिढीपर्यंत पोहोचवणे, हे काळाची गरज आहे. याच उदात्त हेतूने आमदार अमित गोरखे यांनी शब्दांकित केलेल्या 'आधुनिक भारताचे शिल्पकार : युगप्रवर्तक डॉ. बाबासाहेब आंबेडकर' या पुस्तकाचे प्रकाशन आज पुणे येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाले.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या शुभहस्ते या पुस्तकाचे लोकार्पण करण्यात आले.



**पुस्तकाचे वैशिष्ट्य..**

या पुस्तकामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक क्रांतीसोबतच त्यांचे आर्थिक विचार, राष्ट्र उभारणीतील योगदान आणि संविधानाच्या माध्यमातून त्यांनी दिलेला समतेचा संदेश सोप्या भाषेत मांडण्यात आला आहे. हे पुस्तक केवळ एक चरित्र नसून बाबासाहेबांच्या अर्थशास्त्र, जलव्यवस्थापन, वीज निर्मिती आणि कामगार कल्याण यांसारख्या दुर्लक्षित राहिलेल्या पैलूंवर सखोल भाष्य करते. प्रा. डॉ. वैभव ढमाळ यांनी या पुस्तकाची प्रस्तावना लिहिली असून, त्यांनी बाबासाहेबांना 'भविष्याचा शोध घेणारा महामानव' असे संबोधले आहे. यात 'महु ते महामानव' या संघर्षापासून ते 'चिरंतन बाबासाहेब' या प्रवासापर्यंतचा प्रत्येक टप्पा अत्यंत प्रभावीपणे मांडला आहे.

या पुस्तकात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्रीमुक्तीसाठी केलेले प्रयत्न आणि कामगारांना मिळवून दिलेले ८ तासांच्या कामाचे हक्क, यावर विशेष प्रकाश टाकण्यात आला आहे. लेखक अमित गोरखे यांनी आपल्या मनोगतात व्यक्त केल्याप्रमाणे, आजच्या तरुण पिढीला बाबासाहेबांचे 'संवैधानिक नैतिकता' आणि 'धम्म विचार' सुस्पष्टपणे समजावेत, या उद्देशाने या पुस्तकाची निर्मिती करण्यात आली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राजकीय नेतृत्व हे केवळ सत्ता मिळवण्यासाठी नव्हते, तर ते समाजातील शेवटच्या घटकाला 'राजकीय सत्ता' हे प्रगतीचे साधन म्हणून मिळवून देण्यासाठी होते. त्यांच्या मते, जोपर्यंत शोषित वर्ग सत्तेच्या चाव्या हातात घेत नाही, तोपर्यंत सामाजिक गुलामगिरी नष्ट होणार नाही. रिझर्व्ह बँकेची स्थापना असो वा देशातील मोठे धरण प्रकल्प, या सर्वांच्या मुळाशी बाबासाहेबांचे विचार कसे आहेत, हे या पुस्तकातून सिद्ध होते.

हे पुस्तक केवळ दलितांच्या कैवाऱ्याची कथा नसून, एका आधुनिक आणि विज्ञानवादी भारताची निर्मिती करणाऱ्या जागतिक दर्जाच्या नेत्याची गाथा आहे. सामाजिक कार्यकर्ते, विद्यार्थी आणि अभ्यासकांसाठी हा ग्रंथ एक अनमोल ठेवा ठरणार आहे.

### सकारात्मक परिवर्तन घडवून आणणारे..

**» पुस्तकाच्या प्रकाशनप्रसंगी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार हे केवळ एका काळापुरते मर्यादित नसून ते अनंत काळासाठी मार्गदर्शक आहेत. आमदार अमित गोरखे यांनी अत्यंत अभ्यासूवृत्तीने बाबासाहेबांच्या कार्याचा आढावा या पुस्तकात घेतला आहे. समता आणि बंधुतेचा हा विचार समाजात सकारात्मक परिवर्तन घडवून आणण्यासाठी नक्कीच उपयुक्त ठरेल.**

### जीवनाचे प्रेरणास्थान

**» या प्रसंगी आपली भूमिका मांडताना आमदार अमित गोरखे म्हणाले, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आधुनिक भारताचे खरे निर्माते आहेत. त्यांचे विचार माझ्या जीवनाचे प्रेरणास्थान राहिले आहेत. बाबासाहेबांनी दिलेली समता, स्वातंत्र्य आणि बंधुतेची शिकवण जनमानसात, विशेषतः तरुणांमध्ये अधिक प्रभावीपणे रुजावी, या भावनेतून मी या पुस्तकाचे लेखन केले आहे. माझ्या लेखणीतून मांडलेला हा विचारांचा दीप समाजाला नवी दिशा देणारा ठरेल, असा मला विश्वास आहे.'**

# नागरिकांना अग्निशमन सेवा तत्पर वेळेवर देण्यासाठी सज्ज : उपायुक्त व्यंकटेश दुर्वास

## राष्ट्रीय अग्नि सुरक्षा सप्ताह, शहीद अग्निशमन जवानांना श्रद्धांजली, आठवडाभर विशेष अग्निसुरक्षा प्रशिक्षण व प्रात्यक्षिक उपक्रम

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका अग्निशमन विभागाचे अधिकारी व कर्मचारी नागरिकांना तत्पर, प्रभावी आणि वेळेवर सेवा देण्यासाठी सज्ज आहेत. या सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांना अग्निशमन विभागाच्या माध्यमातून समाजसेवेची संधीच मिळाली आहे, असे प्रतिपादन उपायुक्त व्यंकटेश दुर्वास यांनी केले. २०१९ मध्ये दापोडी येथे घडलेल्या दुर्घटनेत शहीद झालेले अग्निशमन कर्मचारी विशाल जाधव यांच्या शौर्यपूर्ण कार्याचा अग्निशमन विभागाला अभिमान आहे, असे देखील त्यांनी सांगितले.



पिंपरी चिंचवड महानगरपालिका अग्निशमन विभागाच्या वतीने १४ एप्रिल ते २० एप्रिल २०२६ दरम्यान 'राष्ट्रीय अग्नि सुरक्षा सप्ताह' आयोजित करण्यात आला आहे. या सप्ताहाची सुरुवात संत तुकाराम नगर येथील मुख्य अग्निशमन केंद्रात झाली. या प्रसंगी उपायुक्त व्यंकटेश दुर्वास यांनी शहीद अग्निशमन कर्मचाऱ्यांना पुष्पचक्र अर्पण करून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. या कार्यक्रमाला अग्निशमन अधिकारी ऋषिकांत चिपाडे, उप अग्निशमन अधिकारी चंद्रशेखर घुले, गौतम इंगवले, दिलीप गायकवाड, अनिल डिंबळे, श्रीकांत वैरागळ, सुनिल फरांदे यांच्यासह अग्निशमन विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

उपायुक्त दुर्वास म्हणाले की, आपत्ती व्यवस्थापनात 'प्रतिबंध (प्रिव्हेन्शन), पूर्वतयारी (प्रिपेअरनेस) आणि तात्काळ प्रतिसाद (रिस्पॉन्स)' या तीन घटकांचे पालन करणे अत्यावश्यक आहे. प्रतिबंधात्मक उपाययोजनांवर भर दिल्यास अनेक दुर्घटना टाळता येऊ शकतात, तर योग्य पूर्वतयारीमुळे आपत्कालीन परिस्थितीला प्रभावीपणे सामोरे जाता येते. तात्काळ आणि समन्वयित प्रतिसादामुळे जीवित व मालमत्तेचे होणारे नुकसान वाचवता येते. या तिन्ही बाबींचा समतोल राखणे हेच यशस्वी आपत्ती व्यवस्थापनाचे सूत्र आहे.'

अग्निशमन विभाग नागरिकांना तत्पर, प्रभावी आणि वेळेवर सेवा देण्यासाठी सदैव सज्ज आहे. या सप्ताहात अग्निशमन विभागाचे कर्मचारी शहरातील महानगरपालिका कार्यालये, पोलीस स्टेशन, रुग्णालये, शाळा तसेच सोसायट्यांमध्ये अग्निसुरक्षा प्रशिक्षण व प्रात्यक्षिक देणार आहेत.

### कर्मचाऱ्यांच्या कल्याणासाठी निधी संकलन

**» पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने १४ एप्रिल ते २० एप्रिल दरम्यान आयोजित अग्नि सुरक्षा सप्ताहाच्या निमित्ताने, अग्निशमन दलातील कर्मचाऱ्यांच्या कल्याणासाठी कार्यरत असलेल्या दि महाराष्ट्र फायर सर्व्हिसेस पर्सोनेल वेल्फेअर असोसिएशनसाठी निधी संकलन उपक्रमाची सुरुवात उपायुक्त व्यंकटेश दुर्वास यांच्या हस्ते करण्यात आली. या उपक्रमाद्वारे आपत्कालीन परिस्थितीत मदत तसेच कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांना आर्थिक आधार देण्याचा महत्त्वपूर्ण प्रयत्न केला जात आहे. यावेळी अग्निशमन विभागातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत 'सेवा परमो धर्म' या भावनेतून योगदान देण्याचे आवाहन करण्यात आले असून, अशा उपक्रमांमुळे अग्निशमन दलातील कर्मचाऱ्यांप्रती कृतज्ञता व्यक्त होऊन सामाजिक बांधिलकी अधिक दृढ होत असल्याचे नमूद करण्यात आले.**

# धर्मादाय संस्थांना इमारतीसाठी कर सवलत : मुख्यमंत्री फडणवीस

## 'लता-आशा मंगेशकर इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस'च्या कोनशिला अनावरण समारंभात मुख्यमंत्री बोलत होते.

**पुणे | प्रतिनिधी**

सध्या धर्मादाय संस्थांनाही इमारतीसाठी परवानगी देताना व्यावसायिक इमारतींप्रमाणे कर आकारला जातो. या करात काही प्रमाणात सूट देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याची ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी दिली.

लता मंगेशकर मेडिकल फाउंडेशनच्या 'लता-आशा मंगेशकर इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस'च्या कोनशिला अनावरण समारंभात मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, महापौर मंजूषा नागपुरे, फाउंडेशनचे अध्यक्ष पंडित हृदयनाथ मंगेशकर, विश्वस्त उषा मंगेशकर, राज्याचे उच्च आणि तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, विधानपरिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे, आनंद भोसले, आदिनाथ मंगेशकर, लता मंगेशकर फाउंडेशनचे वैद्यकीय संचालक डॉ. धनंजय केळकर उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, 'सध्या परवडणाऱ्या आरोग्यसेवेची सर्वाधिक गरज आहे. प्रत्येक व्यक्तीला चांगले आणि परवडणारे उपचार मिळाले पाहिजेत. त्यासाठी अनेक धर्मादाय संस्था, रुग्णालये काम करतात. मात्र, वेगवेगळ्या पद्धतीच्या वित्तीय संकटांमुळे या वैद्यकीय सेवेचे व्यावसायिकीकरण झालेले दिसते. अशा प्रकारच्या व्यावसायिकीकरणाची संधी असतानाही केवळ सेवा म्हणून एखादा उपक्रम कसा केला पाहिजे, याचे पंडित दीनानाथ मंगेशकर रुग्णालय हे उदाहरण आहे.'

'मंगेशकर ट्रस्टच्या रुग्णालयाने सेवेचा सौदा न करता सेवाभाव कायम ठेवून लाखो रुग्णांना आरोग्य सेवा देण्याचे कार्य केले. हेच कार्य नव्या रुग्णालय प्रकल्पाच्या माध्यमातून पुढे नेण्यात येईल,' असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. 'लता-आशा इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस'कडे येजा करण्यासाठी पुरेशा रुंदीचा रस्ता आणि पाण्याची सुविधा पुणे महापालिकेच्या माध्यमातून उपलब्ध करण्याची सूचना मुख्यमंत्री फडणवीस यांनी महापौर नागपुरे यांना केली. रुग्णालयात संगीतोपचाराची सुविधा निर्माण करण्याची सूचना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी फाऊंडेशनला केली.

कार्यक्रमाच्या पूर्वार्धात राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार आणि प्रसिद्ध गायिका आशा भोसले यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. आमदार भीमराव तापकीर, सुनील कांबळे, सिद्धार्थ शिरोळे, बापू पठारे, हेमंत रासने आदी उपस्थित होते. मिलिंद कुलकर्णी यांनी पंडित हृदयनाथ मंगेशकर यांचे मनोगत सादर केले. वैशाली जोगळेकर, शंतनू गोखले, अमर ओक, पांडुरंग पवार यांनी सांगीतिक कार्यक्रम सादर केला.



### नव्या रुग्णालय प्रकल्पाला चालना

» लता मंगेशकर मेडिकल फाउंडेशनच्या 'लता-आशा मंगेशकर इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस' प्रकल्पाची कोनशिला ठेवण्यात आली. या संस्थेकडे जाण्यासाठी रस्ता व पाणीपुरवठा सुविधा उपलब्ध करून देण्याच्या सूचना मुख्यमंत्र्यांनी दिल्या. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रुग्णालयात संगीतोपचार सुविधा सुरू करण्याचा सल्ला दिला. या प्रकल्पामुळे पुण्यात परवडणाऱ्या आरोग्यसेवेला मोठी चालना मिळणार आहे.

### मुख्यमंत्र्यांची महत्त्वाची घोषणा

» पुणे येथे झालेल्या कार्यक्रमात देवेंद्र फडणवीस यांनी धर्मादाय संस्थांना इमारत परवानगी देताना आकारल्या जाणाऱ्या करात सवलत देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. सध्या अशा संस्थांनाही व्यावसायिक इमारतींप्रमाणे शुल्क आकारले जाते. त्यामुळे सामाजिक आणि आरोग्य क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थांना दिलासा मिळण्याची शक्यता आहे. या निर्णयामुळे नवीन धर्मादाय रुग्णालये व सेवाभावी प्रकल्पांना प्रोत्साहन मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

### 'सेवेत वाटा उचलणे गरजेचे'

» 'शिक्षण आणि आरोग्य या दोन्ही गोष्टी परवडणाऱ्या आणि सुलभ असण्याची गरज आहे. सर्व प्रकारचे उपचार एकाच ठिकाणी उपलब्ध झाली, तर रुग्णावर होणारा खर्च कमी होतो. समाजात अनेक जण काहीही अपेक्षा न करता सेवा करत आहेत. त्यामुळे आपलेपणा टिकून राहतो. सेवा प्रकल्प सुरू रहाणे गरजेचे असते. त्यात प्रत्येकाने आपला वाटा उचलला पाहिजे,' असे आवाहन सरसंघचालक मोहन भागवत यांनी केले.

# महापालिकेच्या उत्पन्नवाढीसाठी संयुक्त समिती; स्थायी सदस्य व प्रशासनाचा सहभाग

## स्थायी समिती सदस्यांसह वरिष्ठ अधिकारी करणार उत्पन्न उद्दिष्टांचा आढावा

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महानगरपालिकाच्या २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी सुमारे १५ हजार ६६९ कोटी रुपयांचे अंदाजपत्रक मुख्य सभेत मंजूर झाले आहे. या अंदाजपत्रकातील उत्पन्नाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी संयुक्त समिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या समितीत स्थायी समिती सदस्यांसह प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश असणार असल्याची माहिती स्थायी समिती अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी दिली.

या समितीत श्रीनाथ भिमाले यांच्यासह विशाल धनावडे, संदीप बेलदरे, रुपाली धाडवे, मयुरी कोकाटे, प्रशांत जगताप आणि सुहास टिंगरे यांचा समावेश करण्यात येणार आहे. प्रशासनाकडून महापालिका आयुक्त, अतिरिक्त आयुक्त, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच संबंधित विभागांचे प्रमुख अधिकारीही समितीत सहभागी राहणार आहेत.

महापालिकेच्या महसूलवाढीसाठी करसंकलनातील सुधारणा, थकबाकी वसुलीला गती, नवीन महसूल स्रोतांचा शोध तसेच विविध आर्थिक उपाययोजनांचा आढावा घेणे ही समितीची प्रमुख जबाबदारी असेल. तसेच आर्थिक शिस्त मजबूत करून अंदाजपत्रकातील उद्दिष्टे साध्य करण्यावर भर दिला जाणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

महापालिकेच्या वाढत्या आर्थिक गरजा लक्षात घेता या समितीच्या माध्यमातून उत्पन्नवाढीसाठी ठोस पावले उचलली जाण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.




### अंदाजपत्रकासाठी विशेष समिती

» 'पुणे महानगरपालिकाच्या २०२६-२७ च्या १५,६६९ कोटी रुपयांच्या अंदाजपत्रकातील उत्पन्न उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी संयुक्त समिती स्थापन करण्यात येणार आहे. या समितीत स्थायी समिती सदस्यांसह महापालिका आयुक्त, अतिरिक्त आयुक्त, मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि विभागप्रमुखांचा समावेश असेल. करसंकलन सुधारणा, थकबाकी वसुली, नवीन महसूल स्रोतांचा शोध आणि आर्थिक शिस्त मजबूत करणे ही समितीची प्रमुख जबाबदारी राहणार आहे. या माध्यमातून महापालिकेच्या महसूलवाढीस चालना देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

# खडकवासला धरणातील पाणी 31 ऑगस्टपर्यंत राखीव

## अल निनोमुळे पाऊस उशिरा; पुणे शहरासह जिल्ह्यासाठी पाणीपुरवठ्याचे मोठे आव्हान निर्माण

**पुणे | प्रतिनिधी**

दर वर्षी 31 जुलैपर्यंत पिण्यासाठी पाणी राखीव ठेवण्यात येत असले, तरी यंदा 'अल निनो'मुळे खडकवासला धरण साखळीतील पाणी 31 ऑगस्टपर्यंत पिण्यासाठी राखीव ठेवण्याचा निर्णय जलसंपदा विभागाने घेतला आहे. यंदा पाऊस उशिरा व पावसाचे प्रमाण कमी असल्याने उपलब्ध पाण्याचा शहर व जिल्ह्यातील एक कोटी नागरिकांना, तसेच 66 हजार हेक्टर शेतीला पुरेशा प्रमाणात पुरवठा करण्याचे मोठे आव्हान प्रशासनासमोर उभे आहे.

धरण साखळीत गुरुवारी (दि. 16) रोजी 12.26 टीएमसी (42.07 टक्के) पाणीसाठा शिल्लक होता. गतवर्षीपेक्षा 1.30 टीएमसी अधिक पाणी धरण साखळीत आहे. असे असले तरी गतवर्षीपेक्षा यंदा उन्हाची तीवता अधिक आहे. 40 डिग्री सेल्सिअसवर तापमान गेले आहे. त्यामुळे पाण्याची मागणी वाढली आहे, दुसरीकडे धरणातील पाण्याचे बाष्पीभवन वाढले आहे. त्यामुळे पाणीसाठ्यात दर तासागणिक घट सुरू आहे. 'अल निनो'मुळे हवामान पाऊस लांबण्याची, तसेच कमी पावसाची शक्यता वर्तवली आहे. त्यामुळे आगामी साडेचार महिने पुणेकरांसह जवळपास एक कोटी नागरिकांची तहान भागविण्यासाठी जलसंपदा विभागाला कठोर उपाययोजना कराव्या लागणार आहेत

तीव उन्हामुळे आगामी काळात जवळपास एक टीएमसी पाण्याचे बाष्पीभवन होणार आहे. पाणीटंचाईचे संकट निर्माण होऊ नये, उपाययोजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे, शेतीच्या नावाखाली पाणीउपसा करणाऱ्या खडकवासला व इतर धरण तीरावरील हॉटेल, रिसॉर्ट, वॉटर पार्क, खासगी कंपन्या आदींवर कठोर कारवाई करण्यासाठी मोठी यंत्रणा जलसंपदा विभागाला उभी करावी लागणार आहे. महापालिकेने जलसंपदा विभागाकडे उन्हाळ्यात तीन महिन्यांसाठी वाढीव पाण्याची मागणी केली आहे. मात्र, याबाबत वरिष्ठ पातळीवर अद्याप कोणताही निर्णय झालेला नसल्याचे खडकवासला जलसंपदा विभागाने स्पष्ट केले आहे.



### वरसगाव, पानशेतमधून विसर्ग सुरू

» टेमघर धरण जवळपास कोरडे पडले आहे. पानशेत व वरसगाव धरणांच्या वीजनिर्मिती केंद्राच्या सांडव्यातून खडकवासला धरणात पाणी सोडले जात आहे. त्यामुळे खडकवासलाची पाणीपातळी 50 टक्क्यांवर आहे. सध्या वरसगावमधून 600 व टेमघरमधून 500 क्युसेक पाणी खडकवासलात सोडले जात आहे.

### आतापर्यंत क्षमतेइतक्या पाण्याचा विसर्ग

» खडकवासला धरण साखळीची एकूण पाणीसाठवण क्षमता 29.15 टीएमसी इतकी आहे. गेल्या वर्षी अधिक प्रमाणात पाऊस पडला, त्यामुळे 27.91 टीएमसी जादा पाणी सोडण्यात आले. जवळपास क्षमतेइतके पाणी धरण साखळीतून सोडले. याचा लाभ तीन महिने पुणेकरांसह शेती व उजनी धरणाला झाला.

> पाऊस कमी व उशिरा पडल्यास पाणीटंचाईचे संकट निर्माण होऊ नये, यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याच्या सूचना शासनाने दिल्या आहेत. पाण्याची चोरी, गळती रोखण्यासाठी उपाययोजना करण्यात येणार आहे.
>
> - गिरिजा कल्याणकर-फुटाणे, शाखा अभियंता, खडकवासला धरण विभाग

> मुख्यमंत्री कार्यालयाने अल निनोमुळे उपलब्ध धरणसाठ्याचे योग्य नियोजन करून 31 ऑगस्टपर्यंत पिण्यासाठी पुरेसा प्रमाणात पाणीपुरवठा करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे यंदा 31 जुलैऐवजी 31 ऑगस्टपर्यंत पिण्यासाठी पाणी राखीव ठेवण्यात येणार आहे.
>
> - मोहन भदाणे, उपविभागीय अभियंता, खडकवासला जलसंपदा विभाग

---

# जुन्नर आदिवासी भागात अवैध माती उत्खनन; मातीमाफियांचा धुडगूस

## अवैध उत्खननामुळे रस्ते उद्ध्वस्त; प्रशासनावर संगनमताचा आरोप, कारवाईची मागणी

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेने अखेर शहरातील अनधिकृत रेडी मिक्स कॉंक्रिट प्रकल्पावर कारवाई सुरू केली आहे. बुधवारी पहाटे लोहगाव-खांदवे नगर तसेच खराडी परिसरातील ८ आरएमसी प्लॅन्ट व अन्य बांधकामे जमीनदोस्त केली. या कारवाईत एकूण ५२ हजार २५० चौरस फूट अनधिकृत कच्चे- पक्के शेड आणि बांधकामे हटविण्यात आली. पहाटे दोन वाजता ही कारवाई करण्यात आली.

मात्र, या कारवाईवेळी स्थानिक नगरसेविकेचे पती आणि महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या कर्मचाऱ्यांमध्ये जोरदार वाद झाला, त्यानंतर नगरसेविकेच्या पतीस पोलीस ठाण्यात नेण्यात आले. तसेच कारवाईनंतर सोडून देण्यात आले. शहरात गेल्या महिन्यापासून आरएमसी प्रकल्पामुळे होणाऱ्या धुळीच्या प्रदूषणाच्या मोठ्या प्रमाणावर तक्रारी आल्या आहेत. खांदवे नगर येथील प्रकल्पाबाबत तक्रारी आल्याने महापालिकेने या प्रकल्पांना सील ठोकत ते बंद केले होते.

अतिक्रमण विभागाचे पथक मोठ्या पोलीस बंदोबस्तात दाखल झाले. त्यांनी कारवाई सुरू केली. यावेळी नगरसेविका डॉ. श्रेयस खांदवे यांचे पती प्रीतम खांदवे यांनी घटनास्थळी जाऊन कारवाई थांबविण्याचा प्रयत्न केला. तसेच, महापालिकेने कारवाईपूर्वी कोणतीही नोटीस दिलेली नाही. प्रकल्प आधीच बंद आहे, अशा सांगत कारवाई करण्यास विरो ध केला. कारवाईसाठी गेलेल्या महाराष्ट्र सुरक्षा दलाच्या सुरक्षा रक्षकांनी त्यांना ताब्यात घेऊन पिंजऱ्यामध्ये बसवले आणि पोलिस ठाण्यात घेऊन गेले. त्यानंतर महापालिकेने उरलेली कारवाई पूर्ण केली



### अपघातांचाही धोका

» अवजड वाहनांच्या सततच्या वाहतुकीमुळे आधीच जीर्ण अवस्थेत असलेले रस्ते अधिकच खराब झाले असून, स्थानिक नागरिक व वाहनचालकांना मोठ्या प्रमाणावर त्रास सहन करावा लागत आहे. काही वाहनचालक बेदरकारपणे वाहन चालवत असल्याने गंभीर अपघातांचाही धोका निर्माण झाला आहे.

> आदिवासी भागात अवैध गौण खनिज उत्खनन करणाऱ्या मातीमाफियांविरोधात कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल. महसूल प्रशासनातील तलाठी, मंडल अधिकारी किंवा इतर संबंधित कर्मचाऱ्यांनी कर्तव्यात कसूर केल्यास त्यांच्यावर देखील कठोर कारवाई करण्यात येणार आहे.
>
> - बाळासाहेब सिरसाठ, तहसीलदार, जुन्नर